Review Of Research
ISSN: 2249-894X Impact Factor : 3.8014(UIF) Volume - 6 | Issue - 3 | December - 2016

# मध्ययुगीन संत साहित्यातील संशोधनाच्या नव्या दिशा

डॉ. राजेंद्र वाटाणे
सहयोगी प्राध्यापक, तायवाडे महाविद्यालय, महादुला, कोराडी.




प्राचीन व मध्ययुगीन मराठी साहित्याचा विचार करताना संतकाव्य, पंतकाव्य आणि तंतकाव्य अशा तीन काव्य परंपरांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागतो. त्यात संत काव्याची परंपरा हीच मध्यवर्ती व महत्वाची परंपरा आहे; हे आज सर्वमान्य झाले आहे. संत साहित्य हा मराठी संस्कृतीचा आणि भारतीय अद्वैत परंपरेचा एक अविभाज्य घटक आहे. ''संत साहित्य हा महाराृाचा वारसा असून संतत्व आणि कवित्व यांचा अपूर्व संगम संताच्या साधनाभूत साहित्यातून झाला आहे.''[1] संतसाहित्य ही 'रचना' नसून ती दिव्यस्फूर्ती आहे. ज्ञानेश्वरांपासून तो तुकारामांपर्यंत विविध संतांच्या प्रासादीक साहित्याने मध्ययुगीन मराठी वाङ्मय समृद्ध असल्यामुळे त्याचे वैभव निराळेच आहे आणि त्यामुळेच संतकाव्याची ही परंपरा खऱ्या अर्थाने आजही अभंग आहे. 'संत' या शब्दाची उकल करताना डॉ. रत्नाकर बापू मंचरकर म्हणतात, ''संत हा शब्द संस्कृत आहे. 'अस्' म्हणजे होणे या धातूपासून होणारा, असणारा या अर्थाने 'सन्' हे रूप तयार झाले. त्याचे बहुवचन 'संत' हे होय.''[2]

कुठलीही साहित्यकृती ही त्या लेखकाची निर्मिती असते. लेखकाने आपला जीवनप्रत्यय भाषारूपाने एका सौंदर्यपूर्ण संरचनेत तीत साकार केलेला असतो. ही साहित्यकृती रसिकांच्या आस्वादाचा विषय असते. संत साहित्याच्या वाङ्मयीन अभ्यासालाही ही चौकट उपयुक्त ठरते. ज्ञानेश्वरादी संतांनी ज्या समन्वयात्मक विचाराचा पाया घातला तो समन्वयात्मक विचार आज आपल्यापर्यंत आला आहे. कारण संत हे केवळ कवी नव्हते. तर ते परमार्थाच्या वाटेवरील दीपस्तंभ होते. त्यांची दृी काव्यरचनेपेक्षा, लोकोद्धाराकडे अधिक होती त्यामुळे ते खऱ्या अर्थाने तत्त्वज्ञ, समाजसुधारक व धर्मकर्ते ठरतात. संताचा पिंडच मुळात लोकोद्धाराचा असल्यामुळे त्यांचे साहित्य बहुपरिमाणात्मक आणि कसदार झाले आहे. संतांची कविता प्रामुख्याने त्रैवर्णिकांसाठी वेदाधिकार नाकारलेल्या शूद्रातिशूद्रांसाठी आणि स्त्रियांसाठी होती.

या संतकाव्य परंपरेनेच कविधर्म मराठी भाषेत प्रकट केला आहे. मराठी साहित्याच्या प्रारंभिक अवस्थेतच निर्माण झालेल्या, या कसदार संतसाहित्याची जनमानसावरील पकड आजही कायम आहे. कारण संतसाहित्य निर्मितीच्या प्रेरणाच मुळात सामाजिक व सांस्कृतिक होत्या. संतांनी आपल्या साहित्यातून आध्यात्मिक समता प्रस्थापित करण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. संतांनी सत्याचा आग्रह धरून मनुष्याला नितीची शिकवण दिली. ''सत्य हा शब्द 'सत्' पासून आलेला आहे. 'सत्' म्हणजे जे टिकणारे आहे ते आणि 'सत्' म्हणजे जे चांगले आहे ते. सत्यातही या दोन अर्थच्छटा आहेत. सत्य हे चिरकाल टिकणारे असते आणि ते चांगलेही असते.''[3] सत्य हे समाजाची धारणा करणारे एक व्यापक व श्रेष्ठ तत्व असल्याने संतांनी त्याचा पुरस्कार केला.

संतसाहित्याचा अभ्यास करतांना विद्यार्थ्याने काव्यविशेषांचा अभ्यास करायचा असतो. त्याला संतांच्या तत्वविचारांशी काही कर्तव्य नाही, असाही एक फार मोठा अपसमज रुढझालेला कधी कधी प्रत्ययाला येतो.

पण जे प्राचीन वा मध्ययुगीन संतसाहित्य मला पंत व तंत साहित्याकडेही अंगुलीनिर्देश करायचा आहे. ते धर्मपंथाच्या

अनुषंगाने निर्माण झालेले आहे. अध्यात्म आणि भक्ती जी संताच्या जीवनाला व्यापून राहिली आहे तीच त्यांचा वाड्मयालाही व्यापून राहिली आहे. ती त्यांची जीवननिष्ठा आहे म्हणून त्या जीवनानुभवाचा एकसंघ विचार व्हायला हवा. काळाच्या प्रवाहातही हे वाड्य अक्षर व अभंग राहिले आहे. काळ आणि अभिरुची यांच्या चाळणीतून जे शिल्लक राहते तेच खरे वाड्मय. प्राचीन साहित्य हा भाषा व संस्कृतीचा मानदंड आहे. या साहित्याचे आवाहन सार्वत्रिक व सार्वकालिक आहे. म्हणून संशोधनात संबंधित संतांच्या अनुभवसंपन्न व्यक्तिमत्वाच्या खुणांचा शोध घेणे, त्यातील तत्वज्ञान समजून घेणे व त्यातील शैलीचा विचार म्हणजे वाड्मयीन रुपाचा विचार करणे हे महत्वाचे ठरते. संतसाहित्याच्या रुपाने आध्यात्मिक लोकशाहीचे दर्शन घडते. पण याचा अर्थ परमार्थाने घ्यावयास हवा हे विसरले जाते.

संतसाहित्याचे संशोधन करतांना संतांचे बहुआयामित्व लक्षात घेतले पाहिजे. संतांचे मूल्यमापन आपण आजच्या सामाजिक संकल्पनांचे निकष लावून करतो आणि मग संतांच्या वाड्मयात आजचे आर्थिक विचार, समाजवादी विचार, सामाजिक समता शोधू लागतो, म्हणून संतांचे प्रकृतिधर्म व्यक्तिमत्व, जीवनदृी, जीवननिष्ठा यांच्या संदर्भातच संशोधन केले पाहिजे त्यासाठी त्याचे वेगळेपण, त्यांची पंथनिष्ठाही लक्षात घ्यावी लागते. शिवाय त्यांच्यावरील वाड्मयीन संस्कारही विचारात घ्यावा लागतो. शिवाय अनुभव घेण्याची क्षमता आणि पातळीही लक्षात द्यावी लागते. ज्ञानेश्वरांचा अभ्यास करायचा तर ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासी या प्रस्तानत्रयीचा एकत्र विचार करावा लागतो.

संतांच्या साहित्याकडे राजकीय, सामाजिक दृकिोनातून पाहण्याचा पायंडा न्यायमूर्ती रानडे यांनी घातला. इंग्रजी राज्यामुळे नवी जाणीव, नवे जागरण घडले पण राजकीय स्थित्यंतर आल्याबरोबर सांस्कृतिक वैचारिक स्थित्यंतरही घडून येत असते. त्यामुळे वाड्मयाकडे पाहण्याचा दृकिोन बदलतो. हे खरे असले तरी आजच्या मापदंडाने संतसाहित्याकडे पाहता येणार नाही. बा. र. सुंठणकरांनी 'महाराृ संतमंडळाचे ऐतिहासिक कार्य' सांगतांना मार्क्सवादाच्या संदर्भात आर्थिक विचाराची पहाणी केली. पण त्याचा प्रारंभ लालजी पेंडसे यांच्या 'साहित्य आणि समाजजीवन' या ग्रंथात आढळतो.

परंतु हे विसरले जाते की कोणतीही वाड्मय निर्मिती ही लौकिकाधारित असली तरी अलौकिक पातळीवरील, अलौकिक रुपाची सृी असते. तिला तिचे म्हणून वास्तव असते. तर्कशास्त्र असते. रुपही असते व ते स्वायत्त, स्वयंपूर्ण असते, म्हणून साहित्य–संशोधनाची उद्दि व त्यामागील प्रेरणा आणि प्रवृत्ती भिन्न असतात. कोणत्या जीवनार्थाने कोणते रुप घेतले याचा शोध येथे महत्वाचा ठरते. मग ते साहित्य आधुनिक असो की प्राचीन असो.

वाड्मयीन संशोधनाचे स्वरुप विमर्शक–विचारपद्धतीचे असते. उदा. ज्ञानेश्वरी ही गीताटीका आहे. हे खरे पण ती शांकरभाष्यासारखी किंवा वामन–पंडीतांच्या यथार्थ दिपीकेसारखी आहे काय? जर वेगळी आहे तर काव्यविषयापासून तर आविष्कारापर्यंत ती वेगळी असेल, तर हे लेखन अभूतपूर्व आहे हे कळते. 'भाष्यकाव्य' ही कल्पना स्फुरते. मग या संकल्पनेचा प्रत्यय ज्ञानेश्वरीत कसा येतो. मग श्रीमद्भगवतगीता हा विषय केवळ वैचारिक नाही तर 'भगवद्गीतेचा साक्षांत अनुभव' म्हणजे 'अनुभूतीचा अविष्कार करणारी साहित्यकृती म्हणून प्रतीत होतो' ही प्रतीती काव्यकृतीची प्रतीती देणारी आहे हे कळते. 'भाष्य हेच येथे काव्यरुप पावते' हे लक्षात येते. सांप्रदायिक साहित्याचे संशोधन हे विशुद्ध साहित्यसंशोधनाच्या Power Literary Research भूमिकेतून झाले नव्हते (काही अपवाद) त्याचप्रमाणे ऐतिहासिक कागदपत्रे, बखरी, लावणी, पोवाडे इत्यादींचे संशोधन इतिहासाच्या अंगाने जितके झाले तितके 'साहित्याचे स्वरुप' Form of Literature म्हणून झाले नव्हते.

वाड्मयीन संशोधन विशेषतः प्राचीन व मध्ययुगीन साहित्य संशोधन हे विशि ग्रंथकारनिष्ठ, कालखंडनिष्ठ, धर्मसंप्रदायनिष्ठ क्वचित शैव/वैष्णवादी विचारप्रणालीनिष्ठ अशा अंगानेही करता येईल करता येतेही?

संशोधनात 1. तथ्यलक्षी संशोधन 2. संहितानिष्ठ संशोधन 3. अन्वयार्थप्रधान संशोधन म्हणजे नवसिद्धांताचा शोध घेणे 4. सर्जनशिल संशोधन (समीक्षेच्या अंगाने नवसर्जन करणे. यात नवसिध्दांताच्या अनुरोधाने केलेल्या पुनर्विवेचनात संशोधनही असते.) इत्यादी पद्धतीने करता येते.

संतकाव्याची निर्मिती ज्या काळात झाली त्या काळातील समाजजीवनाशी प्रादेशिक वातावरणाशी, धर्म, परंपरा, कला आणि संस्कृतीशी तसेच राजकीय परिस्थितीशी त्याचा संबंध असल्याचे स्प जाणवते तो संबध जाणून घेतल्यास संत साहित्याच्या प्रेरणांचे आणि स्वरुपाचे नेमके आकलन आपणास होऊ शकते. 'संतसाहित्य' म्हणजे प्रामुख्याने संतांनी निर्माण केलेले साहित्य. तेराव्या शतकात ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी किंवा भावार्थदिपीका ही गीताटीका लिहिली. तेव्हापासूनची ही संतसाहित्याची परंपरा सोळाव्या शतकातील तुकाराम, रामदासांच्या

साहित्यापर्यंत सातत्याने चालत आलेली दिसते. विठ्ठलभक्तीच्या परंपरेत निर्माण झालेल्या संतांनी जे साहित्य निर्माण केले, त्या साहित्यालाच मुख्यत्वे 'संतसाहित्य' म्हणून संबोधले जाते. संत साहित्याच्या या चारशे वर्षाच्या प्रवाहात समाजाच्या अठरा पगडजातीतून संत उदयाला आले व त्यांनी अध्यात्माच्या व भक्तीच्या माध्यमातून नानाविध स्वरुपाची काव्यरचना करुन एक आगळी–वेगळी भक्तीचळवळ निर्माण केली. '''संत' शब्दाचा साधुपुरुष, सत्पुरुष' असा सामान्य अर्थाने प्रयोग होत असला तरी त्याचा विशि अर्थ वेगवेगळ्या संदर्भात वेगवेगळा असल्याचे दिसते.''[4] लोकोद्धराकरिता तळमळणाऱ्या व मानवतेच्या कल्याणासाठी झटणाऱ्या व्यक्तींना मध्ययुगीन काळात 'संत' ही उपाधी देण्यात आलेली दिसते. 'संत' ही अध्यात्मक्षेत्रातील उच्च कोटीची अवस्था आहे. संत हे कोणत्या ना कोणत्या धर्मसंप्रदायाचे अनुग्रहीत होते. त्या सांप्रदायिक सत्पुरुषांचे व स्त्रियांचे विविध गद्य–पद्य प्रकारातून अविष्कृत होणारे परमार्थपुरक साहित्य म्हणजे संतसाहित्य. संतांनी भक्ती, वैराग्य, तत्वज्ञान, नितीबोध, सदाचार या विषयांच्या संदर्भात साहित्य निर्मिती केलेली दिसते. एकूणच सर्व मांगल्याचे अधिष्ठान असलेली सर्व भूतमात्रांविषयी कणव पोटात सामावून घेणारी तेजस्वी व भावगम्य अशी संतांची कविता ही मराठी भाषेचे चिरंतन झळाळणारे संचित आहे.

टी.एस. इलिएट यांनी साहित्य व परंपरा, साहित्य व धर्म,साहित्य व नैतिकता इत्यादींची नाती आपल्या समीक्षाग्रंथात लक्षात घेऊन त्यावर प्रकाश टाकला आणि प्राचीन व मध्ययुगीन साहित्याकडे पाहण्याचा सुजाण वाङ्मयीन दृकोिन प्रकट केला. या दृनेि पाहता संतांचे अभंगवाङ्मय म्हणजे मध्ययुगीन उत्कट भावकाव्याचा एक मौलिक साठाच वाटू लागतो. स्फुटत्व, उत्कटता, भावानुभवांची आंतरिक लय, तालबद्धता, प्रतिमांकितता, प्रतीकरुपता तरल संवेदनशीलता, आत्माविष्काराची प्रबलता इत्यादी आधुनिक भावकवितेचे म्हणून ओळखले जाणारे सर्व प्रकृतीविशेष संतांनी निर्मिलेल्या अभंगातून प्रकट झाले. ''संतांनी भागवताला अनुसरून कृष्णभक्ती अथवा विष्णुभक्ती स्वीकारली. ते वैष्णव झाले परंतु त्यांनी भागवतातील श्रीकृष्ण घेतला नाही तर पुंडलीक नामक भक्ताने कर्नाटकातून आणलेली श्री विठ्ठलमूर्ति स्वीकारली''[5] व त्याला अनुसरून अभंगरचना केली.

संताची काव्यरचना वैचित्र्यपूर्ण विविध आयामी आहे. यात भाष्यकाव्याप्रमाणेच आख्यान कविता, स्फुटकविता अशी विविध रुपेही आढळतात. ज्याप्रमाणे या संतसाहित्याने समकालिनांना रिझविले त्याचप्रमाणे अर्वाचीनांनाही आपलेसे केले. परंतु अर्वाचीन विद्याविभूषित अभ्यासक–संशोधकांची दृष्टी निश्चितच परंपरावाद्यांपेक्षा निराळी होती. त्यांनी संतसाहित्याकडे केवळ परमार्थाचे साधन म्हणून न पाहता स्वतंत्र वाङ्मयनिर्मिती म्हणून पाहिले. त्यातूनच संतसाहित्याची बहुआयामी प्रकृती त्यांच्या लक्षात आली व संतसाहित्याविषयी चिकित्सा सुरु झाली. विसाव्या शतकात संतसाहित्याच्या या बहुआयामी अभ्यासाला प्रारंभ झाला व त्याचा विस्तारही झपाट्याने झाला. अजवर पाठ चिकित्सापर, लिपिसंशोधनपर, छंदशास्त्रीय, भाषाशास्त्रीय, व्याकरणशास्त्रीय, तत्वज्ञानपर, साहित्यशास्त्रीय, कोशनिर्मितीपर, लोककलात्मक, वैदिक परंपराशोधनपर, सांप्रदायिकशोधपर, इतर कलानुबंधी शोधनपर असे संशोधन झालेले आहे. त्यात कोणी त्यातील भाषेचे विश्लेषण केले, कोणी त्यातील दुर्बोध शब्दांचा कोश करण्यावर भर दिला. कोणी त्यांच्या तत्वज्ञानाची मांडणी करू लागले तर कोणी त्यात तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब पाहू लागले; कोणी त्याच्या समकालीन राजकीय–सामाजिक परिस्थितीचे त्यांच्या स्वरुपाशी अनुबंध जोडू लागले; कोणाला संत साहित्याने केलेल्या स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा यासंबंधातील जागृतीचे कौतुक वाटले, तर कोणी त्याच्या काव्यसौंदर्याकडे आकृ झाले; कोणी त्याचे लोकसंस्कृतीतील धागेदोरे शोधू लागले. तर कोणी संस्कृतीमधील धार्मिक वाड़मयात त्याची मुळे शोधली; कोणी त्याच्या प्रकाशात आजच्या समाजव्यवस्थेला मार्गदर्शक तत्वांचा शोध घेतला. अशी अनेक अभ्यासाची असंख्य दालने उघडली गेली. परंतु असा प्रश्न निर्माण होतो की या संशोधनात अधिक भर पडली आहे का? इतर ज्ञानशाखांच्या आधारे मध्ययुगीन संतसाहित्याचे संशोधन होते आहे का? तर या प्रश्नाचे उत्तर नाही, असेच द्यावे लागेल. एवढेच नव्हे तर आजपर्यंत झालेल्या संशोधनाचे पुनर्मूल्यांकनही अजून झालेले नाही. यासारख्या प्रश्नांच्या साहाय्यानेच नव्या दिशांच्या शोधाला चालना प्राप्त होऊ शकते. आपल्याकडे वि.का. राजवाडे, वि.ल. भावे, य.खु. देशपांडे, वा. वि. मिराशी, वि.भि. कोलते, के.ल. दप्तरी, अ. ना. देशपांडे, म.रा.जोशी, श्री.मा. कुळकर्णी, डॉ. सुरेश डोळके, वा.सी. बेंद्रे, ल.रा. पांगारकर, ज.र. आजगावकर, गं. बा. सरदार, यु.म. पठाण यासारख्या बऱ्याच संशोधकांनी संशोधनाची एक परंपराच निर्माण केली आहे. त्यांच्या संशोधनाची व्याप्ती आणि परिभाषा लक्षात घेऊन संशोधन विद्येची मांडणी करण्याची गरज आहे.

संशोधन ही एक अत्यंत लवचिक अभिक्रिया आहे, म्हणून आजपर्यंत मध्ययुगीन संतसाहित्याचे झालेले जे संशोधन आहे त्यात भर पडली पाहिजे. संत साहित्याच्या संशोधनात संहितानिश्चितीचा एक जटिल प्रश्न आहे.

जसे ज्ञानदेवांच्या अभंगांची संहितानिश्चिती, नामदेवगाथा संहिता निश्चिती इत्यादींचा शोध आजपर्यंत घेतला गेला आहे. पण आजही त्यात अनिश्चितता जाणवते. एक पक्ष नाही. त्यामुळे आजच्या बदलत्या सामाजिक वातावरणात प्राचीन व मध्ययुगीन साहित्याकडे वळण्याचा प्रयत्न नवे अभ्यासक फार अभावाने करतांना दिसतात. याचाही विचार होणे अपरिहार्य आहे. आजही अनेक वस्तुसंग्रहातील हस्तलिखिते, विविध मठ, पंडितांची पिढीजात घराणी, पंढरपूर येथील श्रीधरस्वामींची पोथीशाळा, धुळे येथील समर्थ वाग्देवता मंदिर, तंजावर, बडोदा येथील वास्तुसंग्रहालयात अनेक मराठी हस्तलिखिते अप्रकाशित आहेत. त्यांच्या विविध प्रकारी अभ्यासातून संशोधन परिपूर्ण होऊ शकेल.

मध्ययुगीन संतसाहित्याच्या गाथांच्या अनेक संपादित आवृत्या आज सिध्द झाल्या आहेत. प्रत्येक काळात निरनिराळ्या प्रयोजनासाठी त्या सिद्ध झाल्या आहेत. त्यांचेही पुनर्मूल्यांकन होऊन संहिता सिद्ध केल्या पाहिजेत. त्यासाठी परंपरा सांप्रदायिकता विशिष्ट प्रयोजने आणि उपलब्ध ग्रंथसंहिता तपासून पाहणे गरजेचे आहे.

जसे नामदेवाच्या अभंगगाथेचे संपादन गोंधळेकर प्रत, घरतप्रत, आवटे प्रत, चित्रशाळा प्रत, महाराष्ट्र शासनाची प्रत ही सर्व संपादने सुमारे शंभर वर्षातील आहेत. गोंधळेकरांनी पहिली आवृत्ती 1892 साली प्रसिद्ध केली. पंढरपूर आणि आळंदी येथून त्यांनी अभंग संकलित केले. त्यांची शास्त्रशुद्ध तपासणी करून त्यांचा स्विकार केला. त्या अभंगांचे विषयानुसार वर्गीकरण केले. याच आधाराने पुढे घरत, आवटे आणि चित्रशाळा यांची संपादने सिद्ध झाली आहेत. परंतु पहिल्या संपादनात ज्या त्रुटी राहिल्या पुढे त्याचीच पुनरावृत्ती झाली. त्यात अभंगरचनांची उलटापालट, भाषेचे अर्वाचीनिकरण, नाममुद्रा नसेलेल अभंग, दुबार अभंगांमुळे सदोष संहिता झाली व तीच पुनःपुढच्या काळात स्वीकारली गेली. यात संख्या अनिश्चिती, परिवारातील अभंग, उत्तरकालीन रचना अंतर्भूत झाल्या. 1970 साली शासनाने आपली प्रत प्रसिध्द केली. या प्रतीत पूर्वमुद्रित प्रतीतील अभंगावर अवलंबून न राहता एकूण तीस हस्तलिखितांचा अभ्यास करुन संघटणी केली आहे. त्यातही धुळे हस्तलिखित अतिप्राचीन म्हणून स्वीकारले असून तशा नोंदी केल्या आहेत. आज आपण ही प्रत स्वीकारित असलो तरी तिच्यात एकवाक्यता नाही. त्यातूनच 'संत नामदेवांचा सार्थ चिकित्सक गाथा' डॉ. मु.श्री. कानडे व रा.शं. नगरकर यांनी संपादित करून प्रमाणीत अभंग व प्रक्षिप्त अभंग दाखवून दिलेले आहेत. त्यातही नामदेवांच्या 2143 अभंगापैकी 1294 अभंग प्रमाणित तर 849 अभंग प्रक्षिप्त दाखविले आहेत. नामदेव गाथेच्या आजवर झालेल्या सर्व संपादनात अभंगसंख्या कुठेही समान नाही. घरत प्रतीत जास्त अभंग तर गोंधळेकर प्रतीत सर्वात कमी अभंग आढळतात. त्यातील प्रक्षेप, विक्षेप, अवक्षेप अजूनही तसेच आहेत. त्यामुळे वारकऱ्यांच्या फडातील नामदेवांचे अभंग, धुळे–तंजावर येथील हस्तलिखिते यांचा पुनर्विचार होण्याची गरज आहे. हाच प्रश्न ज्ञानेश्वरांच्या अभंग गाथेविषयीही निर्माण होतो – तात्या नेमीनाथ पांगुळ यांनी 1927 साली संपादित केलेल्या या गाथेत एकूण 765 अभंग आहेत. परंतु त्यातील 77 अभंगामध्ये कुठे नाममुद्रा नाही तर काही अभंगात ज्ञानदेवांचा कुठेही उल्लेख न येता निवृत्तीनाथ, सोपानदेव इ. नावाचा उल्लेख आलेला आहे. यानंतर 1969 साली प्र. न. जोशी यांनी 'सार्थ श्रीज्ञानदेव अभंगगाथा संपादित करून त्यात 1100 अभंग ज्ञानदेवांच्या नावावर दाखविले आहेत. परंतु त्यांनीच आपल्या संपादकीय निवेदनात प्रस्तुतच्या सार्थ श्रीज्ञानदेव गाथेत अभंगांची चिकित्सा करता आलेली नसल्यामुळे यातील कित्येक अभंग श्रीज्ञानदेवांचे आहेत असे म्हणण्यापेक्षा श्रीज्ञानदेवांच्या नावावर आहेत असे म्हणणेच अधिक यथार्थ ठरण्यासारखे आहे. अशी प्रांजळ कबुली दिली आहे व संहिता निश्चितीची गरज व्यक्त केली आहे.

ज्ञानदेव नामदेवांसारख्या प्रमुख संतांच्या अभंगात ही तफावत जाणवते तर तत्कालीन इतर अलक्षित संतांच्या अभंगात किती तफावत असेल याची कल्पनाही करता येत नाही. संत सेना न्हावी यांच्या अभंगाच्या संहिता निश्चितीचा मी विचार केला तेव्हा मला ज्या सहा अभंगगाथा प्राप्त झाल्या त्यात देखील कुठेही अभंग संख्येची एकवाक्यता नव्हती तर प्रत्येक गाथेत कमी अधिक अभंग आढळून आले. शिवाय रा.चिं. ढेरे सारख्या साक्षेपी अभ्यासकांच्या संपादनातही दुबार अभंग आढळले. बऱ्याच अभंगगाथांमध्ये पुनरावृत्ती होऊन अभंग संख्येत वाढझालेली दिसून आली तर कुठे उत्तरकालीन संतांचे अभंग समावि केलेले आढळले. हीच बाब सर्वच संतांच्या अभंग वाङ्मयाबद्दल दिसून येते. त्यामुळे एकूणच संतांच्या अभंगाची प्रमाणित संहिता निर्माण होणे आज अपरिहार्य झालेले आहे.

जो प्रश्न संहिता निश्चितीबद्दल भेडसावत आहे तोच प्रश्न संतांचे चरित्र व चमत्काराविषयी देखील निर्माण झालेला दिसतो. त्यांचाही विचार करणे गरजेचे आहे. संतांची समकालीन चरित्रे उपलब्ध नाहीत. आज जी संतचरित्रे आपल्याला परिचित आहेत ती उत्तरार्धात (सतरावे–अठरावे शतक) लिहिली गेलेली चरित्रे आणि मौखिक

परंपरेने चालत आलेल्या आख्यायिका यांची मिळून बनलेली आहेत. त्यामुळे संताचा जन्म, काळ, नाममुद्रा इ. संबंधी बरेच वाद आढळतात. याचाही शास्त्रशुध्द विचार झाला पाहिजे.

नामदेवांसारख्या काही संतांनी चरित्रपर व आत्मचरित्रपर काव्य लिहिले ते अतिशय समृद्ध आहे. संतांना त्यांच्या अध्यात्मसाधनेत मार्गदर्शन घेण्याची पूर्वकालीन व समकालीन संतांच्या चरित्राचा शोध घेण्याची व त्या चरित्रानी भारावून जाऊन ती शब्दबध्द करण्याची प्रेरणा होणे स्वाभाविकच होते. उत्कट प्रेरणेतूनच नामदेवांनी ज्ञानदेवांचे चरित्र लिहिले. शिवाय त्यांच्या समकालीन गोरा कुंभार, जनाबाई, चोखामेळा, सावतामाळी इ. संतांची स्फुट चरित्रेही अभंगबद्ध केली आहे. नामदेवांची ही संतचरित्रे मूलतः उत्स्फूर्त आहेत. संतचरित्रलेखनाचा कोणताही आदर्श नामदेवांपुढे नसतांनाही संतासंबधीच्या अतीव ओढीने, प्रीतीने व भक्तीने प्रेरीत होऊन त्यांनी ही चरित्रे लिहिली आहेत. याप्रमाणे महानुभाव पंथातील म्हाइंभटांनी पंथप्रणेते श्रीचक्रधरस्वामी, श्रीगोविंदप्रभू व नागदेवाचार्य यांची चरित्रे लिहिली असून ती गद्यात्मक आहेत. त्यातून तत्कालीन मराठी गद्याचे स्वरुप, समाजदर्शन, संस्कृतीदर्शन यासोबतच चरित्रनायकाच्या जीवनाची रुपरेषा स्प होते यात एक लक्षणीय संतचरित्रकार म्हणून महिपतीने केलेले कार्य निश्चितच महत्वपूर्ण आहे. यादृीने नामदेव, सेना न्हावी, गोरा कुंभार, चोखामेळा, संत तुकाराम, बहिणाबाई इत्यादी संतकवींनी प्रासंगिक स्वरुपात रचलेली आत्मचरित्रपर काव्ये देखील लक्षणीय ठरतात. तुकारामांचे आत्मचरित्रपर अभंग त्यांची स्वजीवनाकडे पाहण्याची वास्तवलक्षी दृी व निकोप प्रांजळवृत्ती प्रकट करतात. याचाही संशोधनात विचार होणे गरजेचे ठरते. संतांनी आत्मनिवेदनात्मक अभंगातून स्वतःच्या जीवनाविषयी लिहिले आहे. महानुभाव शिष्यांनी 'चौकस, जिज्ञासूबुद्धीने विचारलेल्या प्रश्नांतून चक्रधरस्वामींनी एकांकातील लिळा आत्मकथनाच्या रुपात सांगितल्या आहेत. त्यात अवतार ग्रहण, पूर्वजन्मीचे प्रसंग प्रवृत्ती, व्यसने, साधना, शिद्धी विद्यास्विकार आणि लोकसंग्रहाच्या निमित्ताने झालेल्या घटनेतून घडलेल्या प्रसंगाचे कथन, स्वतःवर प्रकाशझोत ठेवीत अत्यंत प्रांजळपणे झाले आहे. याचप्रमाणे आद्य चरित्रात्मक लेखनाची सामग्री संकलित होण्यास महानुभावाच्या स्मरणभक्तीच्या तत्वज्ञानाची सूत्रे कारणीभूत झाली. 'प्रसादसेवे' सारख्या प्रकरणातून चरित्रविषय झालेल्या चक्रधरस्वामींच्या जीवनाशी संबंधित अशा सामग्रीचे संकलन व जपणूक होऊ शकली. 'स्थानपोथी' सारख्या ग्रंथातून चक्रधरस्वामींच्या स्पर्शाने पवित्र झालेली स्थाने, भौगोलिक व लीलाविषयक तपशिलासह नोंदण्यात आली. नागदेवासारख्या अनुभवी व्यक्तीकडून खऱ्याखोट्याची चिकित्सा होऊ शकली ही सारी संशोधनाला महत्व देणारी उदाहरणे आहे.

नामदेव जनाबाई यांनी केलेल्या चरित्रलेखनात समाकालीनत्वामुळे आत्मप्रत्ययावर विसंबून आवश्यक तेवढी चरित्रविषयक माहिती संकलित करून इतर मजकूर आत्मानुभवावर आधारीत लिहिलेला आहे. नामदेवांनी लिहिलेल्या ज्ञानेश्वर चरित्राच्या 'आदि' मध्ये जेवढी माहिती सामग्रीदाखल संकलित झाली. त्यामानाने 'तीर्थावळी' व 'समाधी' ही प्रकरणे अंतःस्फूर्तीवर विसंबलेली दिसतात. येथे पुराणातून उपलब्ध होऊ शकणाऱ्या सामग्रीचा अंतर्भाव या चरित्रलेखानात झालेला दिसतो. कीर्तन संप्रदायाचे संकेत चरित्रलेखनाशी जुळवून टाकण्याचे कार्य नामदेवाने केले. वारकरी सांप्रदायिक संताची चरित्रलेखनाची भूमिका काहीशी समाजशिक्षकाची उपदेशकाची असल्याचे दिसून येते. विशि गुणसमुच्चयाला धरून ते चरित्र लिहीत. भक्तीच्या तत्वज्ञानाशी व भावस्थितीशी साम्य दाखविणारे अनुभव त्यांना अपेक्षित होते. त्याची उत्कटता प्रतीत होण्यासाठी ते ईश्वराला मानुषी व्यक्तिमत्वात कल्पनेच्या पातळीवर का होईना चरित्रातून आणीत होते. संतचरित्रातील भक्तीच्या उत्कट प्रसंगाशी या कल्पनांचा सांधा ते श्रद्धाभावाने जोडून त्या त्या संतांच्या अभंगलेखनातून अशा स्वरुपाच्या अलौकीक अनुभूतीचे आकार ते शोधीत. वारकरी सांप्रदायिक चरित्रलेखक हे स्वतः संतत्वाच्या भूमिकेत वावरत असल्याने ते जे लिहीत त्याचा त्यांना प्रत्यय येत होता.

संतचरित्राचा अभ्यास करतांना प्रत्येकच संताच्या जीवनात चमत्काराला विशेष महत्व दिलेले दिसते. संतांच्या अलौकिक चमत्कारामुळे त्यांचे दिव्यत्व सिद्ध करण्याचाही प्रयत्न झालेला दिसतो. परंतु संतांच्या काळाचा विचार करता असे लक्षात येते की, त्याकाळी एखादी गो विचार लोकांच्या मनावर बिंबवायचा असला तर त्यासाठी अध्यात्म हे प्रभावी माध्यम होते. त्यामुळे संतचरित्राच्या माध्यमातूनच त्या संतांच्या अलौकिक कार्याचे त्यांच्या विषयीच्या विविध चमत्कारांचे संदर्भ देण्याचा प्रघात सुरू झालेला दिसतो. त्यातही लोकमानसासाठी चरित्र लिहीत असल्यामुळे त्या लोकमानसाच्या काही वृत्ती त्यांच्या पुढे होत्याः विशेषतः व्यक्तीमधील अलौकीकत्वाचा जेव्हा ते विचार करी तेव्हा त्याला काहीतरी चमत्कार घडावेत, मन स्तिमित व्हावे, असे वाटत असावे. चमत्कारकथांपैकी पुष्कळसे कल्पनाबंध योगशास्त्रामध्ये वर्णन केलेल्या सिद्धीच्या स्वरुपाचे दिसतात. तेराव्या शतकात

योगमार्गासंबधीचे बरेचसे कुतूहल दिसून येते. समाधी किंवा ध्यानस्थ अवस्थेत भूतकाळ आणि भविष्याचे ज्ञान होणे, पूर्व जन्माचे स्मरण होणे, दुसऱ्याच्या मनातील हेतू जाणणे, रोषबुध्दी निवारणे यासारख्या चमत्कारांच्या सिद्धी पातंजल योगसुत्राच्या तिसऱ्या स्कंधात दिलेल्या आहेत. या कल्पनाबंधाप्रमाणेच ज्ञानेश्वर, चक्रधरस्वामी, नामदेव, जनाबाई, सेना न्हावी, चोखामेळा, गोराकुंभार, एकनाथ, तुकाराम, रामदास इत्यादींच्या चरीत्रात्मक लेखनातील कल्पनाबंध वाटतात. परंतु आजच्या काळाचा विचार करता संताच्या चमत्कारांचा अन्वयार्थ लक्षात घेतल्यास त्या त्या संतांच्या स्वरुप व कार्याची प्रचिती आपणास सहजच येते. शिवाय काही चमत्कार केवळ निवेदनाचे संकेत म्हणून लक्षात घेता येतात. काही चमत्कार तत्वज्ञानाच्या कल्पनांचे स्पीकरण देण्याच्या इच्छेतून निर्माण झालेले दिसतात. तर काहींमध्ये फक्त कथात्मक रंजकतेचे स्वरुप दिसून येते. त्यासाठी चमत्कारातील अन्वयार्थाकडे लक्ष देणे अपरिहार्य ठरते.

उदा. 'तुकारामांचे अभंग इंद्रायणीच्या पाण्यावर तरंगले या चमत्काराचा अन्वयार्थ लावतांना तुकारामांच्या कवितेची महानता विशद करुन त्यांचे काव्य लोकांच्या हृदयापर्यंत जाऊन पोहोचले असल्याची जाणीव करून देत त्यातील वास्तवता पटवून देणे महत्वाचे ठरते व त्यातूनच त्यांच्या अभंगाच्या गाथा इंद्रायणीत न करण्यात आल्या तरी त्यांच्या अभंगांचा ठसा लोकमनावर उमटला असल्याने त्यांचे काव्य अभंग राहिले याची जाणीव करुन दिल्यास त्या चमत्काराचे रहस्य कळून येईल. याच दृीने सर्व संतांच्या चमत्कार कथांकडे पाहिल्यास चमत्कारासंबंधीचा प्रश्न निश्चितच संपुात येऊ शकेल, याचाही विचार संशोधनात होणे आवश्यक आहे.

संत साहित्याचा वाङ्मयीन अंगाने अभ्यास करतांना सर्वप्रथम या वाङ्मयाचा समावेश कुठल्या प्रकारात, (आकृतीबंधात) केला जातो, याचा विचार करणे अपरिहार्य ठरते. कारण ''मराठीतील बहुतेक समीक्षक रसालंकारांच्या भाषेतच संतसाहित्याची सौंदर्यमीमांसा करताना दिसतात.''[6] सर्वच संतसाहित्य हे धर्मसाहित्य आहे पण सर्वच धार्मिक साहित्य हे संतसाहित्य असतेच असे नव्हे त्यामुळेच संतसाहित्याची संकल्पना स्वतंत्रपणे सिद्ध करावी लागते. ''अध्यात्म, भक्ती, परमार्थ, मोक्ष हाच संतांचा मुख्य विषय''[7] असून संत आपल्या सहित्याद्वारे धर्मप्रकाश सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहचवितात. संतांचे साहित्य धर्म, तत्वज्ञान व अध्यात्म यांचे संदर्भ घेऊन अवतीर्ण झालेले दिसते. संतसाहित्याचा वाङ्मयीन अभ्यास करतांना त्याचे सातत्याने भान ठेवणे आवश्यक आहे. वैदिक धर्माची चौकट अबाधीत ठेवून आणि तत्वज्ञान हा आत्मानुभवाचा विषय बनवून संतांनी अध्यात्मसाधनेचा, संतत्वाचा व नैतिकतेचा जो श्रेष्ठ आदर्श उत्तरकालीन संतापुढे ठेवला त्याचा अंगीकार करुनच पुढील संतसाहित्याची वाटचाल सुरु असलेली दिसते. नामदेवांनी समस्त भारतभ्रमण करुन 'नाचू किर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी' ही उक्ती सार्थ करून आजच्या आंतरभारतीचे स्वप्न सातशेवर्षापूर्वी पूर्ण केले. याचे उदाहरण म्हणजे नामदेवांच्या अभंगवाणीला 'श्रीगुरु ग्रंथसाहिब' या शिखांच्या पवित्रग्रंथात मिळालेले स्थान होय. नामदेवांचाच वारसा कबीर, कमाल, मिराबाई , नानक या हिंदी भाषिक संतानी पुढे नेला. तर सेना न्हावी यांच्या सारखे संत मराठी संताच्या ओढीने येथे येऊन मराठी माती व मराठी मनाशी एकरुप झाले व त्यांनी महाऱ्ााला आपली कर्मभूमी बनविले. इतकेच नव्हे तर 'फादर स्टीफन्स' सारखे ख्रिस्ती कवी ही मराठी संत काव्याने प्रभावित होऊन संतकाव्याच्या धर्तीवर काव्य करण्यास पुढे आले. संतांनी आपल्या प्रकृतीनुसार संतत्वाचा शोध घेत स्वानुभावनिष्ठ साहित्यनिर्मिती केलेली आहे. महानुभाव ग्रंथकारात जशी गद्यलेखनाची तीव्र प्रेरणा आढळते तशी संतकवीत काव्यनिर्मितीची तीव्र प्रेरणा दिसून येते. कारण संतांचे अनुभवविश्व हे मुळातच कवीचे अनुभवविश्व होते. संतांना जीवनाच्या दैनंदिन तपशिलात रस नव्हता तर त्यांना शाश्वत आनंदाची आत्मीक अनुभूती हवी होती. संतसाहित्याचा वाङ्मयीन अभ्यास हा प्रामुख्याने अध्यात्म, तत्वज्ञान आणि अविष्कृती या पद्धतीनेच करावा. संतसाहित्य हे काव्य कोणती रुपे धारण करते व ते का धारण करते याचा शोध संतसाहित्याच्या वाङ्मयीन अभ्यासात महत्वाचा ठरतो. याचप्रमाणे संतसाहित्याचा अभ्यास व्याकरणाच्या अंगानेही होणे गरजेचे आहे. अलिकडे असा अभ्यास होऊ लागला ही समाधानाची बाब आहे.

मराठी संतांच्या आख्यानकाव्याचा विचारही संशोधनात झाला पाहिजे. संतांनी लिहिलेली आख्यानकाव्ये मर्यादित असली तरी ती वैशिष्ट्यापूर्ण आहेत. त्यामुळेच ''प्रेरणा, प्रकृती, निर्मितीप्रक्रिया, आकृतिबंध, भाषा, निवेदन पद्धती, व्यक्तिचित्रनिर्मिती, प्रसंगनिर्मिती इत्यादी बाबतीत संतांची आख्यानकाव्ये पंडिती आख्यानकाव्याहून वेगळी ठरली.''[8] संत नामदेव, जनाबाई किंवा श्रीचक्रधरशिष्या महदंबा यांच्या कथाकाव्यनिर्मितीने मराठी आख्यान–काव्यास प्रारंभ झालेला दिसतो. त्यातील महदंबेचे धवळे, नामदेवरचित आख्यानकाव्ये, जनाबाई रचित–हरिश्चंद्राख्यान व थालीपाक यांच्याही संशोधनाला वाव आहे. संतांच्या गीतरचनेचा विचार करतांना ही

गीतरचना प्रामुख्याने अभंगाश्रयी असल्याचे दिसून येते. ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम व तत्कालीन संतांचा एखादा भावोत्कट अभंग बघता–बघता गीतरुप धारण करतांना दिसतो. त्यामुळे भावमधुर अंभगरचना व गीतरचना यातील सीमारेषा अनेकदा धुसर होऊन हा अभंग की गीत असा संभ्रम निर्माण होतो. संतांनी अभंगास जसे भावकवितारुप दिले तसेच त्यास माहात्म्यगायन, कथाकथन,आत्मकथन, तीर्थाटन, वृत्तांतनिवेदन इत्यादी कथन निवेदनाचे प्रभावी साधन म्हणूनही योजले. संतांच्या अभंगातील भावावर्तनानुसारी, नादानुवर्तने स्थिर होऊन अभंगातूनच 'गीत' हा एक आगळा भक्तिभावप्रधान काव्यप्रकार अस्तित्वात आला. भावगीताच्या रचनाबंधाचा शोध आपल्याच संतकवितेतून का घेतला जाऊ नये. ज्याप्रमाणे अर्वाचीन कवितेतील गीतकाव्याचा विचार केला जातो. त्याचप्रमाणे संतकाव्यातील गीतकाव्याचा विचार करता येऊ शकतो. देशीयतेच्या विचारांच्या दृीने संतांची भावकविता विचारात घ्यावी. गीतकाव्य, गीतरचना व पदे अशा तीन स्वरुपात संतसाहित्यातील गीतरुपे अविष्कृत झालेली आहेत. उदा. मोगरा फुलला, घनु वाजे घुणघुण' पैल तो गे काऊ कोकताहे, नको देवराया अंत आता पाहू, वृक्ष वल्ली आम्हां सोयरी, आनंदाचे डोही आनंद तरंग, तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल यासारखे कितीतरी अभंग विशुध्द गीतकाव्येच ठरतात शिवाय लोकगीतांचे बंध स्विकारुन प्रकटणारी पाळणा, धावा, आरती स्तोत्रे यासारखी रचना गीतरचनेतच समावि होते. याचाही विचार संशोधनात झाला पाहिजे.

भारतीय भक्ती आंदोलनाच्या संदर्भात ही संतसाहित्याचा विचार करता येईल. संतांनी लिहिलेल्या साहित्याचे समान सुत्र कोणते ? याचाही विचार होणे गरजेचे आहे. संतसाहित्याचा वाङ्मयीन अभ्यास करतांना त्यातील जीवनाशय आणि रुपसिद्धी यांचे स्वरुप, नाते आणि संदर्भ स्प करणे हितावह ठरते. तौलनिक साहित्याभ्यासात असा अभ्यास करता येऊ शकतो. महाराात बोपदेवांनी भक्तीला सर्वश्रेष्ठ रसाचे स्थान दिले. त्याचे धागे बंगालमधील श्रीचैतन्यप्रभूच्या काव्यात तसेच भक्तिरसायन यांच्या काव्यशास्त्र विचारात गुंफले गेले. संतांना आपल्या अनुभवातून आणि समाजदर्शनातून जे जाणवले ते त्यांनी व्यक्त केले. श्रेष्ठ अध्यात्ममूल्ये आणि विशुध्द सौंदर्यमूल्ये यांच्या एकीकरणात संतकाव्याचे आध्यात्मिक सौंदर्यशास्त्र स्प होते. संतसाहित्याच्या बहुआयामित्वामुळेच ते लोकांना निरनिराळया कारणांनी भावते. त्यात कुणाला ते धार्मिकदृीने पूज्य वाटते, कुणाला नैतिक सदाचाराच्या शिकवणुकीमुळे मान्य होते. कुणाला त्यातील सौंदर्यसंवेदना भावते. यासारख्या नानाविध अपेक्षा पूर्ण करुन संतसाहित्यातील श्रेष्ठ कृतींनी भविष्यकाळाशी संवाद करण्याची आपली प्रतिसाद क्षमता टिकवून ठेवली आहे. संतसाहित्यातही सौंदर्यमूल्य आणि सौदर्येत्तर मूल्य परस्पराश्रयी ठरतांना दिसतात. याची अनुभूती ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम यासारख्या संतांच्या साहित्यातून उत्कटत्वाने येते. संतांच्या साहित्यकृतीतील आशयसूत्रांचाही शोध घेता येऊ शकतो. शैलीलक्ष्यी आणि संरचनावादी पद्धतीचा वापर करुन त्यांची आविष्कारयंत्रणा उलगडून दाखविता येईल. तर रुपवादी पध्दतीने निरनिराळया घटकांच्या आंतरसंबंधांचा मागोवा घेता येईल.

कुठल्याही साहित्यकृतीचा संबध हा तिच्या वाचकाशी असतो. संतसाहित्याला श्रोत्यांच्या उपस्थितीचे वैशिपूर्ण परिणाम लाभले आहे. त्यात ज्ञानी – भाविक –रसिक असे गट त्यांच्या आवडीनिवडी, प्रतिक्रिया यांच्या अभ्यासातून त्यांच्या अभिरुचीचा बोध होतो आणि तिचा संतसाहित्यावरील परिणामही तपासून बधता येतो.

याचप्रमाणे साहित्यवृतीचा संबंध तिच्या सांस्कृतिक आणि वाङ्मयीन पर्यावरणाशी असतो. संतसाहित्य हे सामाजाच्या संस्कृतीने घडविलेल आहेत. संतसाहित्य आणि त्याचे सांस्कृतिक पर्यावरण यांचे संबंध तपासणे, त्यातील देवघेव स्प करणे हे वाङ्मयविद्येचे क्षेत्र आहे. संतसाहित्याचा आधार घेऊन त्यातील भाषा, तत्वज्ञान यांचाही अभ्यास करता येऊ शकतो. त्यातूनच त्याच्या ऐतिहासिक व सामाजिक परिस्थितीवरदेखील प्रकाश टाकता येतो.

संतसाहित्याचा सामाजिक अंगाने विचार करतांना तत्कालीन समाजव्यवस्था विचारात घेणे अपरिहार्य ठरते. संतानी काळाच्या मर्यादा ओळखून आध्यात्मिक क्षेत्रापुरते जातियतेची प्रस्थ मोडून काढण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांनी ''व्यावहारिक पातळीवर जातिव्यवस्थेला हात लावला नाही.''9 तरी देखील त्यांच्या साहित्यातून जातीभेदाविरुद्ध, ब्राम्हण्याविरुद्ध, सोवळ्याओवळ्याविरुद्ध इतके लिहिले आहे की याची आपणा सर्वांना जाणीव आहेच. भारतातील इतर प्रांतापेक्षा महाराातच समाजसुधारक अधिक निर्माण झाले. याची कारणमीमांसा करतांना त्याचे श्रेय निश्चितच संतांना द्यावे लागते.

संतसाहित्याच्या अभ्यासाचे एक महत्वपूर्ण अंग म्हणजे तत्वज्ञान. या अंगाने सर्वाधीक प्रमाणात सांगोपांग चर्चा ज्ञानेश्वरांच्या तत्वज्ञानाची झालेली आहे. त्याखालोखाल नामदेव, एकनाथ, रामदास, तुकाराम इ. संतांच्या

तत्वज्ञानाचा विचार कमीअधिक प्रमाणात झालेला दिसतो. क्वचितच अभ्यासकांनी अनेक संतांच्या साहित्याचा अभ्यास करुन त्यांच्या तत्वज्ञानासंबंधी लिखाण केले आहे. त्याआधारे प्रत्येक संतांच्या तत्वज्ञानाचा सांगोपांग विचार करण्याला संशोधनात अजुनही बराच वाव आहे. संताच्या तत्वप्रणालीची संरचना करण्याचे हे मोठे काम अजूनही शिल्लक आहे. शिवाय संतांच्या तत्वज्ञानाचा अन्य भारतीय दर्शनांशी असलेला संबंध स्प करणे व भारतीय तत्वज्ञानाला त्यांनी दिलेल्या योगदानाचे स्वरुप पक्के करणे हे देखील आवश्यक आहे.

संतसाहित्याचा मानसशास्त्राच्या दृनिही अभ्यास होणे गरजेचे आहे. संतजीवन आणि संतसाहित्य यांचे बहुकक्ष स्वरुप लक्षात घेतांना संतसाहित्याचे मानसशास्त्र देखील समजून घेतले पाहिजे. त्यातून संतांचे समाजप्रबोधन, तत्वज्ञान साक्षात्कारदर्शन, सौंदर्यसमीक्षा या सर्वांना नेमकी दिशा आणि दृकोिन प्राप्त होऊ शकेल. डॉ. रा.द.रानडे यांनी 'ए कन्स्ट्रक्टीव्ह सर्वे ऑफ उपनिषदिक फिलॉसफी' या ग्रंथात श्रृतीसाहित्याचे धर्म, साक्षात्कार, तत्वज्ञान, नीतिशास्त्र, तांत्रिक मानसशास्त्र इ भूमिकातून समालोचन केले आहे. 'संतसाहित्याचे मानसशास्त्र' जाणून घेतांना त्याचा उपयोग होऊ शकेल.

संताचे जीवन आणि साहित्य हे संताचे मनोविज्ञान आणि संतसाहित्याचे मानसशास्त्र समजून घेण्याची संहिता ठरते. त्यासाठी ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, दासबोध, नामदेव, तुकाराम आणि इतर संतांची अभंगवाणी यांच्या साहाय्याने या मानसशास्त्रीय मीमांसेची प्रमेयमांडणी आणि अंतरंग दर्शन घडवता येऊ शकते. संसाराविषयी 'विरक्ती', ईश्वराविषयी 'अनुरक्ती' आणि फलश्रुती स्वरुप ब्रम्हानुभूती हा भक्तीचा अंतरंग प्रवास संतसाहित्यात विविध रीतीने व्यक्त होतो. हे भावभक्तीचे आवर्तन समजून घेणे म्हणजे भक्तीचे मानसशास्त्र होय. डॉ. सहा यांनी धार्मिक साहित्याच्या वैज्ञानिक अभ्यासाची आवश्यकता पटवून देताना ''मानवी समस्या, नैतिक मूल्यांची भूमिका, मानवी मनाचे सुयोग्य विश्लेषण, शुद्ध आध्यात्मिक अनुभव यांचा एकात्म अभ्यास घडला, तर धर्माकडून मानवी समाजाला गतिमान चेतना लाभू शकेल.''[10] असे जे सांगितले ते निश्चितच चिंतनीय आहे.

मनोवैज्ञानिक भूमिकेतून संतांचे चरित्र आणि साहित्य यांचा अभ्यास झाला तर भक्तियोग, ज्ञानयोग, कर्मयोग, कुंडलिनी महायोग या साधनांची परमोच्च स्थिती असलेली मोक्षसंकल्पना समजू शकेल. संताच्या अभिव्यक्तीचा 'वाच्यार्थ' आणि 'लक्ष्यार्थ समजून घेण्यासाठी मनोवैज्ञानिक पद्धतीचा विकास होणे गरजेचे आहे. जसे 'देह' आणि 'देही' या द्वंद्वातून संतचरित्र विकसित झाले आहे. 'देह ही पंढरी । आत्मा हा विठ्ठल' हा अनुभव जाणून घेण्यासाठी आल्हादिनी शक्तीचे हे अमृतप्रवाह मनोवैज्ञानिक पध्दतीने समजणे महत्वाचे आहे.

याचप्रमाणे संतसाहित्याचा अभ्यास हा लोकसाहित्याच्या अंगानेही होऊ शकतो. त्यासाठी संतसाहित्य व लोकसाहित्य यांचा केवळ अनुबंध न सांगता त्यांचा परस्परांवर झालेला परिणाम तपासणे गरजेचे आहे. याशिवाय संतसाहित्याचा स्वतंत्र वाङ्मयीन इतिहास देखील लिहिला जाऊ शकतो याचेही प्रयत्न होणे गरजेचे आहे.

संत साहित्याच्या अभ्यासाची अशी विविध दालने आज आपल्याला पाहायला मिळतात. तत्वज्ञान, भक्तिविवेचन, नैतिक शिकवण, लोक साहित्याशी अनुबंध, समाजशास्त्रीय घटीत, वाङ्मयेतिहासातील स्थान, वाङ्मयीन सौंदर्य, संहितानिश्चिती, व्याकरण यासारख्या विविध अंगांनी संतसाहित्य समृद्ध होत आहे. आज संतसाहित्य समाजातील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहेचलेल असून त्यांच्या बोली भाषेतूनच या साहित्याचा अविष्कार झालेला आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या त्या त्या काळातील भाषेचे स्वरूप पाहावयाचे झाल्यास संतसाहित्याचाच अभ्यास उपयुक्त ठरतो.

## संदर्भ :

1. संतकाव्य संचित – डॉ. उषा देशमुख – माया प्रकाशन, नागपूर – 2000, पृ. 13
2. संत साहित्य अभ्यासाच्या काही दिशा – (संपा.) डॉ. कल्याण काळे, रां. शं. नगरकर – स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे – 1992, पृ. 37
3. भारतीय विचारधन – प्रा. श्री. मा. कुलकर्णी – विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर – जून 1993, पृ. 15
4. संत साहित्य : अभ्यासाच्या काही दिशा – (संपा.) डॉ. कल्याण काळे, रा. शं. नगरकर – स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे – 1992, पृ. 2
5. वैदिक धर्माची परिवर्तनशीलता – प्राचार्य श्री. ल. पांढरीपांडे – विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर – फेब्रुवारी 1988, पृ. 68
6. संत साहित्य अभ्यासाच्या काही दिशा – कित्ता – पृ. 43

7. संतदर्शन– प्रा. पां. कृ. सावळापूरकर – हिंदूधर्म – संस्कृति मंदिर, धंतोली, नागपूर – 1975, पृ. 11
8. संतसाहित्य : अभ्यासाच्या काही दिशा – कित्ता – पृ. 29
9. तत्रैव, पृ. 11
10. तत्रैव, पृ. 87